# परिशिष्ट-१

## 'अनसूयाबाई आणि मी' एक पहाणी

### प्रस्तावना

पु. बा. काळे यांनी लिहिलेले 'अनसूयाबाई आणि मी' हे आत्मचरित्र प्रा. सुरेश डोळके यांनी संपादित केले आहे. संपादन असूनही या आत्मचरित्राचा विचार येथे केला आहे. काळे यांनी स्वतःचे कर्तृत्व सांगण्यासाठी, आत्मचित्र काढण्यासाठी हे आत्मचरित्र लिहिले नसून ते त्यांनी पत्नीचे काढलेले स्वभावचित्र आहे. 'गाड्याबरोबर नळ्याचा यात्रा' या न्यायाने बाईंच्या चरित्राबरोबर यात ओघाओघाने माझेही आत्मचरित्र अंधुक येऊन गेले व पर्यायाने बाईंची इच्छा काही अंशी तृप्त झाली.''[१] असे त्यांनी यात काढलेले उद्गार विनयाचे किंवा नम्रतेचे नसून खरेच आहेत. या आत्मचरित्रातून काळे यांच्यापेक्षा त्यांच्या पत्नीचे अनसूयाबाईंचे व्यक्तिमत्त्व आपल्या मनात ठसते. पुरुषप्रधान, पुरुषकेंद्री विचारचौकटीने स्त्रीकडे नेहमी अभाववादी दृष्टिकोनातून पाहिलेले आहे. या आत्मचरित्रात काळे यांनी स्वतःला केंद्रस्थानी न ठेवता पत्नीला केंद्रस्थानी ठेवले आहे. म्हणून या आत्मचरित्राचा येथे विचार केला आहे.

आत्मचरित्रभर काळे यांचे विचार आणि वर्तन स्त्रीवादी विचारांच्या जवळ जाणारे आहेत असे दिसून येते. इ. स. १८९० मध्ये जन्म झालेले काळे समाजसुधारणा किंवा स्त्रीदास्यविमोचनाच्या कोणत्याही चळवळीत ओढले गेले नव्हते. त्यांचा अशा चळवळींशी प्रत्यक्षाप्रत्यक्ष संबंध नव्हता. तरीही त्यांचे वर्तन स्त्रीवादी दिसून येते.

*आई : -*

श्री. काळे यांना आईवरील अन्यायाची जाणीव दिसते इतर आत्मचरित्रकारांप्रमाणेच ते आपल्या आईकडे अबोल, संस्कार करणारी, समंजस, उदार, सोज्वळ, काबाडकष्ट सोसणारी या दृष्टिकोनातून पाहतात. तरीही काही सामाजिक सुधारणा मात्र प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न करतात.

आपली आई सकाळी भूपाळ्या म्हणत असे. तेव्हा आपणही तिच्याबरोबर भूपाळ्या म्हणायचे. इतर मुलांनी खारे दाणे आणून खाल्ले आणि काळे यांना दिले नाहीत म्हणून त्यांनी एक पैसा चोरून खारे दाणे खाल्ले. हे त्यांच्या आईला कळताच ती त्यांच्यावर रागावली. त्यांच्या हाताला उलथण्याने डाग दिला. पण तिचा राग शांत झाल्यावर त्यांना पोटाशी धरून ती रडली. तिच्या रागापेक्षा तिच्या मायेमुळेच 'चोरी करू नये' हे तत्त्व आपल्या मनावर बिंबवल्याचे काळे सांगतात. ती फारशी बोलत नव्हती पण तिच्या भावमुद्रांनीच आपल्यावर संस्कार केले आहेत असे ते म्हणतात.

अशा संस्कारी आईच्या दुःखाचीही जाणीव काळे यांना दिसून येते. त्यांची बालविधवा आत्या

साळूमाई हिने लहानग्या काळ्यांच्या गळ्यातील गोफ काढून साळूमाईंचा लोभ असणाऱ्या मोडकबुवांच्या मुलाच्या गळ्यात घातला तेव्हा काळे यांच्या आईला दुःख झाले. याच साळूमाईच्या मुलीवर काळ्यांची थोरली बहीण आईच्या इच्छेविरुद्ध सवत दिल्यानेही त्यांच्या आईला दुःख झाले होते. आईच्या वैधव्यानंतर घरातील बायकांच्या भांडणात आईची बाजू कोणी घेत नसे. त्या काळात ब्राह्मण विधवांची स्थिती कशी करुणाजनक होती. कुटुंबामध्ये तिचा शारीरिक आणि मानसिक छळ कसा होत असे. याचे काल्पनिक वाटणारे चित्र कथाकादंबऱ्यांमधून येताना दिसते. मात्र आपल्या आईच्या नीतीने वागण्याच्या निश्चयाने तिला दिरांचा त्रास कसा सोसावा लागत असे याचे अत्यंत सूचकदर्शन काळे घडवतात. ते म्हणतात, ''ब्राह्मण विधवा म्हणजे सर्वांच्या शिव्याशापांची व्यक्ती. ती जर नीतीने जगण्याचा प्रयत्न करील तर घरातील पुरुषांच्या उपहासाचा आणि अवलोकनेचा विषय एकत्र कुटुंबात तिच्या शारीरिक आणि मानसिक छळाला अंतच नसे. माझी आईही यातून सुटली नव्हती.''[२]

आईवरील अन्यायाची जाणीव असल्यामुळे काही प्रमाणात तिला आनंद देण्याचा ते प्रयत्न करतात. तिच्या आग्रहास्तव तिला सुख व्हावे म्हणून ते लग्न करतात. (त्यांच्या या पत्नीचा मृत्यू १९१३ मध्ये झाला.) इन्टरसायन्सच्या परीक्षेत कॉलेजच्या विद्यार्थ्यांत त्यांचा पहिला नंबर येऊन त्यात त्यांना स्कॉलरशिप मिळाल्यावर त्यातून आईसाठी ३० रु. ची शाल आणतात.

त्यांची आई विधवा असल्यामुळे त्यांची आई अंगात चोळी घालत नसे आणि केशवपनही करत नसे. काळे यांनी आग्रह केल्यावर ती चोळी घालण्यास सुरुवात करते. पण केशवपनापासून मात्र काळे तिला परावृत्त करु शकले नाहीत याची ते कबुली देतात. समाजात येत असलेल्या सुधारणा प्रत्यक्ष आचरणात आणण्याचा ते प्रयत्न करतात.

आईवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध काळे लहानपणी काही करू शकत नव्हते. पण घरातील कटकटींना कंटाळून त्यांच्या आईने त्यांना नोकरीची गळ घातल्यावर ते स्वदेश प्रेमाने सैतानी राज्यकर्त्यांची नोकरी करायची नाही असा आपला निश्चय मोडत नाहीत. त्यांनी पहिले लग्न स्वतःच्या इच्छेविरुद्ध आईच्या सुखासाठी केले. ती पत्नी निवर्तल्यावर मात्र आपल्या पसंतीची मुलगी मिळेपर्यंत लग्न करणार नाही असे सांगितले. अनसूयाबाईंशी लग्न करण्याचे ठरल्यावर त्या कऱ्हाडे म्हणून त्यांच्या आईचा विरोध होता. तेव्हा ते ''माझी आई अतिशय सोज्वळ स्वभावाची व काबाडकष्ट करणारी अशी जुन्या काळातील ब्राह्मण विधवा होती. मीच काय तो तिच्या आशेचा किरण. माझी आई दुसऱ्याची शुश्रुषा करण्यात आनंद मानणारी अतिशय समंजस आणि उदार होती. म्हणून तिची समजूतघालून व खात्री पटवून, या लग्नाला तिची संमती मिळवावयास परिश्रम पडले नाहीत.''[३] असे आईच्या स्वभावाचे उदात्तीकरण करून सोईस्करपणे तिच्या मताकडे दुर्लक्ष करतात.

त्यांची आई पानथरीच्या रोगाने आजारी पडल्यावर त्यांची प्रकृती फारच खालावल्यामुळे तीन दिवसात काळे यांना चार तारा केल्या. काळे तेव्हा जमशेटपूरला नोकरी करत होते. पहिले महायुद्ध

चालू असल्याने रजा मिळत नव्हती. शेवटी चौथ्या तारेवर त्यांना चार दिवसांची रजा मिळाली. पण त्यांची व आईची भेट होऊ शकली नाही. आईची प्रकृती खालावल्याची तार मिळाल्यावरही रजेची वाट पाहत ते थांबतात. येथेही त्यांची व्यवहारवादीवृत्ती दिसून येते.

एकंदरीत पाहता काळे यांनी आईकडे मातृत्वाच्या थोर भावनेतूनच पाहिले असल्याचे जाणवते. तिच्यावरील अन्यायाची जाणीव त्यांना झाली असली तरी ते लहान असल्याने त्या संदर्भात काही करणे त्यांना शक्य नव्हते. नंतर ते नोकरी करण्याइतपत मोठे झाल्यावरही आईच्या मनाचा, मतांचा विचार न करता स्वतःच्या मनाचा कौलच महत्त्वाचा मानतात.

*बहीण : -*

बहिणींच्या संदर्भात काळे फारसा उल्लेख करत नाहीत. त्यांची थोरली बहीण सुंदराताई हिला साळू आत्याच्या मुलीवर सवत म्हणून दिले. त्यांच्या आईला ते पसंत नव्हते. पण ते लहान असल्याने काही करू शकले नाहीत. त्यांचे बाईंशी लग्न झाल्यावर जेव्हा बाई आजारी पडल्या तेव्हा आता ही जाणार म्हणून त्यांच्या बहिणीने बाईंचे उंची कपडे काळे यांच्या आईकडून मागून घेतल्याची केवळ नोंद करतात.[४] त्यावर कोणत्याच बाजूने भाष्य करत नाहीत.

*पत्नी - अनसूयाबाई : -*

काळे यांचे अनसूयाबाईंशी लग्न होण्यापार्वी एक लग्न झाले होते. आईच्या आग्रहास्तव तिला सुख द्यावे म्हणून त्यांनी हे लग्न केले. पण इ. स. १९१३ मध्ये पत्नीचा मृत्यू झाला. त्यानंतर मात्र आईने आग्रह करुनही त्यांनी लग्नास नकार दिला.

सन १९१४ मध्ये अनसूयाबाईंनी फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला तेव्हा काळे तेथेच शिकत होते. कॉलेजमध्येच त्यांची प्रथम दृष्टादृष्ट झाली. पुढे काळे यांच्या चुलतबहिणीच्या मध्यस्थीने त्यांनी अनसूयाशी पत्रव्यवहार सुरू केला पण त्यात अनसूया प्रेमाचा अंकूर अभिव्यक्त करणे कटाक्षाने टाळायची असे काळे म्हणतात. तिचे लग्न तिच्या भावाने एका गृहस्थाशी ठरवले. त्यामुळे त्यांचा पत्रव्यवहार बंद पडला. (पण नंतर भावानेच ते लग्न मोडले.) तिचे लग्न ठरल्यामुळे काळे निराश झाले. दुसऱ्या मुलीशी लग्न करायचे नाही असा निश्चय करून त्यांनी सैन्यात कमिशन मिळवण्याचा प्रयत्न केला. ते न जमल्यामुळे अमेरिकेला स्थायिक होण्याचा विचार केला. पण अचानकपणे १९१६ मध्ये अनसूयाच्या भावाचे मित्र आणि त्यांच्या चुलत बहिणीचे दिर बाबासाहेब लिमये यांनी केलेल्या पत्रव्यवहापामुळे त्यांचे अनसूयाबाईंशी लग्न ठरले. अनसूया सुंदर नव्हती. तिचा वेषही गबाळा असे. ती हेडस्ट्राँग, मनस्वी (Self willed) न्याय अन्यायाच्या कल्पना विलक्षण असणारी अशी होती. याची कल्पना असूनही काळे तिच्याशीच लग्न करण्याचे ठरवतात.

लग्नानंतर बाईंची मनःस्थिती नॉर्मल नसल्याने काळे त्यांना घेऊन नोकरीच्या गावी बंगलोरला

गेले. तेथे संसाराचा महिना दीड महिना सुखाचा गेल्यावर डोहाळे लागणे, त्यांच्या Absence will power या रोगाने उचल खाणे, त्यात त्यांनी कोणालाही न सांगता धारवाड, बेळगाव, पुणे नंतर नाशिकला जाणे, त्यांना काळे यांच्या आईने व मामाने परत बंगलोरला आणले. पुण्यात बाळंत होऊन मुलगा झाल्यावर चवथ्या दिवशी पुन्हा कुणाला न सांगता काळे यांना शोधण्याकरीता पर्वतीकडे पायी जाणे (तेव्हा काळे जमशेटपूरला होते.) तेथून त्यांना कसेबसे घरी आणणे, दोन आठवड्यात मुलगा गेल्यावर पूर्ण वर्षभर बाईंनी आजार काढणे (आजारतील खस्ता काळे यांच्या आईने काढल्या.) आईच्या मृत्यूनंतर काळे जमशेटपूरवरून पुण्याला आल्यावर त्यांना शिव्याशाप देणे, नीरांजन फेकून मारणे, पुन्हा दिवस गेल्यानंतरच्या डोहाळ्यात कुणालाही अद्वातद्वा बोलणे, मुलाच्या मुंजीकरीता पाहुणे जमा झाले असताना काही कारणानिमित्त बाई बाहेर गेल्या असताना सरबत पिण्याची टूम निघाल्यावरून सरबत करुन प्यायल्यावर बाईंनी आल्यावर आपल्या अपरोक्ष सरबत केले म्हणजे आपला अपमान झाला असे वाटून त्या सर्व पाहुण्यांना बोलणे. आपल्या लग्नाच्यावेळी चांदीची भांडी गहाण ठेऊन लग्नसोहळा साजरा करावा लागल्याने लग्नाच्या सिल्व्हर ज्युबिलीला काळे यांनी नवीन चांदीची भांडी भेट दिल्यावरही त्यांनी मनावर ताबा न ठेवता रडारड करणे यासारखा बाईंचा विक्षिप्तपणा काळे सहन करतात. पण नाईलाजाने काही दिवस त्यांना पुण्याच्या मेंटल हॉस्पिटलमध्ये ठेवतात.

जमशेटपूरला गेल्यावरही बाईंना संतापाचे झटके येत असत. बाईंना उद्योग असला म्हणजे अवांतर गोष्टीकडे लक्ष द्यायला आणि मनःसंताप होण्याला अवकाश मिळू नये म्हणून काळे त्यांना आदिवासी मुलामुलींची शाळा चालविण्यास प्रोस्ताहन देतात. हा सार्वजनिक कामाचा संबंध १९२० च्या जानेवारीत तुटला. पण संधी आल्यावर बाईंना मध्यप्रांत लेजिस्लेटिव्ह कौन्सिलवर स्त्री सभासद म्हणून जाण्यास बाईंनी नकार दिल्यावर धीर न सोडता काळे तयार करतात. यानंतर बाई सार्वजनिक कामात रमून जाताना दिसतात.

गांधीजींनी मीठ सत्याग्रहाकरीता प्रत्येक कुटुंबातून एक शिपाई देण्याचे आवाहन केल्यावर काळे यांनी स्वातंत्र्य लढ्यात भाग घेण्याची इच्छा व्यक्त केली. त्याला बाईंनी विरोध करुन स्वतः स्वातंत्र्य लढ्यात जाण्याची युक्ती काढली. शेवटी पंधरा दिवस विचार विनिमय करुन काळे यांनी धंद्यात राहायचे आणि बाईंनी स्वातंत्र्य लढ्यात जायचे ठरवले.

१९५२ च्या पार्लमेंटच्या निवडणुकीसाठी उभे राहण्यास काळे त्यांना प्रोत्साहन देतात व प्रचारात मदत करतात. त्यात त्या निवडूनही आल्या. तसेच १९५७ च्या पार्लमेंटच्या निवडणूकीतही त्या उभ्या राहिल्यावर काळे त्यांना मदत करतात. त्यांचे त्यांचे १९६७-६८ यात इलेक्शन एजंट म्हणून काम पाहतात. त्या निवडून येतात.

आपल्या पत्नीला मनःसंताप होण्यास वेळ मिळू नये म्हणून काळे पत्नीच्या कर्तृत्वाला वाव देताना दिसतात. गांधीजींच्या आवाहनानंतर स्वातंत्र्य लढ्यात जाण्याची त्यांची स्वतःची इच्छा असली तरी बाईंच्या म्हणण्याला मान देऊन बाईंना स्वातंत्र्य लढ्यात जाण्यास परवानगी देतात. सर्वपरीने

त्यांना त्यात सहकार्याही करतात. कॉंग्रेसचा प्रचार करताना खेडेगावातून परत यावयाला बाईंना रात्रीचे दोन दोन, तीन तीन वाजत असत. तेव्हा ते, ''त्यांचे आणि माझे कार्यक्षेत्र बदलले होते. त्याचे परिणाम भोगायला आम्ही दोघेही तयार होतो.''[५] असा समजूतदारपणा दाखवतात.

त्यांचे लग्न झाल्यानंतरच्या काळात त्यांची आर्थिक स्थिती हालाखीची होती. अनसूयाबाईंच्या आजारामुळे त्या काळे म्हणतील त्याला कबूल होत होत्या. हे योग्य नाही याची जाणीव काळे यांना होती. ते म्हणतात, ''मला त्यांचे स्वत्त्व मारायचे नव्हते. पण मी तरी काय करू शकत होतो? कारण आर्थिक परिस्थितीने मला अगदी भंडावून सोडले होते. आमचे नातेवाईक आम्हाला हिडीसफिडीस करत होते. कुणाहीकडे स्वागत होत नव्हते. आम्ही जगात एकटे पडलो होतो...''[६] हे सांगत असताना त्यांच्या मनात पत्नीच्या स्वतंत्र मताला किंमत देण्याची, त्याची कदर करण्याची खरेच इच्छा होती असे दिसून येते. त्यामुळे त्यांनी वरीलप्रमाणे पत्नीच्या कर्तृत्वास वाव मिळण्यासाठी प्रयत्न केला. मदत केली.

एवढ्यावरच न थांबता ते त्यांच्या कर्तृत्वाचे कौतुकही करतात. त्यातूनच पिकेटिंग करताना पकडून चार महिन्यांची त्यांना झालेली शिक्षा, चिमूरच्या दंगलीतील भीतिग्रस्त स्त्रियांना धीर देऊन जमेल तेवढी माहिती गोळा करणे, नागपूरच्या दंगलीतील प्रकरणात ज्यांना फाशी झाली होती त्यांच्यासाठी फाशी निवारक समितीकरिता निधी जमविण्यास श्रम करणे, आपले सर्व प्राण आणि शक्ती पणास लावून त्यांनी सात जणांची फाशी माफ करून घेणे. महिला परिषदेच्या अध्यक्षपदावरुन संततिनियमन आणि 'सोशल अफेअर्स' करिता पोर्ट फोलियो नेमण्याच्या समस्येला वाचा फोडणे यासारख्या कर्तृत्वाचे कौतुक करतात.

परंपरेने जे गुण नाकारले होते अशा बाईंच्या गुणांचा उल्लेख काळे करतात. त्यांचा हेडस्ट्रॉंग, मनस्वी (Self willed) स्वभाव, तापट स्वभाव, मनासारख्या गोष्टी झाल्या नाहीत तर तोल सुटणे, टापटिपीने व नीटनेटके राहणे न जमणे, पुरुषांशी बोलण्यात आत्मविश्वास, कलाकुसरीच्या कामाची नावड, विणण्या शिवण्याचा कंटाळा, उत्तम अस्खलीत बोलणे, कोणाच्या आहारी न जाता फटकून बोलणे व वागणे, तोंडाच्या फटकळ संततिनियमनासारख्या विषयावर धीटपणे गांधीजींशी चर्चा करणे. यासारखे गुण ते उल्लेखतात. त्याचबरोबर त्यांची प्रसिद्धी पराङ्मुखता, न्यायाच्या बाबतीत तंतोतंतपणा, या गुणांचाही उल्लेख करतात. बाईंचा पिंड मातेचा होता. असे सांगून अभ्यंकरांनी बाईंकडून राजकारणात अपेक्षा केल्यावर ''मी स्त्री आहे म्हणजे माझे मातेचे कर्तृत्त्व मला प्रथम पार पाडले पाहिजे. ते साधून जे काय राजकारण किंवा समाजकारण करता येईल तेवढेच मी करीन. त्यामुळे मी राजकारणात पुढे आले नाही तरी चालेल. मी फक्त शिपाई म्हणून राहण्यास तयार आहे. असे बाईंनी अभ्यंकरांनी दिलेले उत्तरही देतात. त्यांच्या मातृत्व भावनेचा ते आदर करताना दिसतात. आपल्या सार्वजनिक कामामुळे मुलांकडे आपले दुर्लक्ष होते असे त्यांना वाटे. किंवा त्या तुरुंगात असताना तेथे मिळणारे दूध त्या धाकट्या मुलांसाठी ठेवत. असा त्यांच्या मातृभावनेचा उल्लेख करतात.

तळेगावला असताना बाईंनी विहिरीचे पाणी काढणे, स्वयंपाक करणे, भांडी घासणे, ही कामे कोणतीही कुरकूर न करता केली तसेच त्या स्वयंपाक करण्यात निष्णात असून त्यांना स्वयंपाकाची आवड होती, प्रकृतीने त्या सुदृढ असून १९२० नंतर त्यांना आजार माहिती नव्हता. त्या अत्यंत हलक्या मनाच्या होत्या. मनाच्या शुद्ध व प्रेमळ होत्या अशा परंपरेने स्त्रियांसाठी सांगितलेल्या गुणांचाही उल्लेख करतात. परंपरेने स्त्रियांसाठी सांगितलेल्या आणि नाकारलेल्या गुणांची ते सहज नोंद घेतात. त्यात कोणताही अभिनिवेश दिसत नाही. किंवा अनसूयाबाईंनी ते बदलावेत असाही त्यांचा आग्रह नाही. पत्नीला एक व्यक्ती म्हणून माणूस म्हणून स्वीकारण्याची त्यांची तयारी दिसते. म्हणूनच बाईंना आर्थिक स्वातंत्र्यही मिळावे अशा काळे यांच्या इच्छेनुसार ते १९२६ मध्ये त्यांच्याच पैशातून त्यांच्या नावाने घर घेतात. पत्नीला आपल्यानंतरही मुलासुनांवर अवलंबून राहावे लागू नये म्हणून 'काळे फाऊंडेशन ट्रस्टला' त्यांचे घर देईपर्यंत ते सर्वस्वी बाईंचे होते. नंतरही ट्रस्टच्या त्या पगारी मॅनेजिंग ट्रस्टी होत्या.

''पुरुषवर्ग स्त्रियांची कुचेष्टा करतो. स्त्रीवरुन शिवीगाळी करतो, याचा बाईंना भयंकर राग. जणू काही त्या पापाला धनी एकटी स्त्रीच'' बाईंच्या या मताचा उल्लेख करुन ''स्त्रीला स्वतःचे अस्तित्त्व असते, तिला मन असते, आशाआकांक्षा असतात. त्या तिने संसार सांभाळून पूर्णत्वाला नेण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि त्याकरिता तिला व्यवहार समजला पाहिजे. तिने स्वतःचा निर्णय घेण्याची शक्ती कमावली पाहिजे आणि स्वतःचे अस्तित्त्व आपल्या घरच्या मंडळींना जाणवून दिले पाहिजे.''[७] या अनसूयाबाईंच्या स्त्रीवादाशी जुळणाऱ्या मताचा काळे आदर करतात. अभ्यंकरांनी अनसूयाबाईंना राजकारणात पूर्ण वेळ काम करण्याची गळ घालण्याचे काम काळे यांना सांगितले तरी ते बाईंच्या त्यासाठी असलेल्या नकाराचा आदर करतात.

परस्परविरोधी आचारविचारांमुळे त्यांची नेहमी कडाक्याची भांडणे होत असत. असे असताही काळे यांची देशसेवेची इच्छा तृप्त करण्याकरीता सर्व नातेवाईक विरुद्ध असूनही बाईंनी त्यांना प्रोत्साहन दिले. लग्नाच्या पहिल्या चार वर्षात आजार, हालअपेष्टा यातून त्या तावूनसुलाखून बाहेर पडल्या. शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचाही काळे यांच्यावर प्रभाव पडू लागला. म्हणून त्यांनी Peace at home at any cost असे ठरवले. ते म्हणतात, ''शिवाय या वेळेपावेतो बाईंना सहा मुले झाली होती. तेव्हा त्या ही हलके हलके शांत होत होत्या. या सर्वांचा परिणाम म्हणून की काय आमचे भांडणाचे प्रकार कमी कमी होऊ लागले.''[८] त्यामुळे प्रथमदर्शनी प्रेमामुळे त्यांनी अनसूयाबाईंशी लग्न केले तरी नंतर त्यांच्या सहवासातून प्रेम निर्माण झाल्याचे दिसते.

काळे यांनी अनसूयाबाईंचा विक्षिप्तपणा सहन केला. त्यांच्या तामसीपणाची झळ तर त्यांना नेहेमीच सोसावी लागली. तरी त्यांच्याशुद्ध अंतःकरणाची त्यांना कल्पना आहे. ते म्हणतात, ''बाईंच्या मनात कुणाहीबद्दल द्वेष, राग अगर मत्सर नसे. एकदा आपला राग ओकून टाकल्यावर त्या सर्व विसरत असत व मग त्यांच्या शुद्ध अंतःकरणाचा प्रत्यय येई.''[९] तसेच जेव्हा त्यांची आर्थिक परिस्थिती

हालाखीची होती तेव्हा बाईंनी दाखवलेला मनाचा सुसंस्कृतपणा, तळेगावला गरीबीत दिवस काढावे लागल्यावर त्या जीवनात प्रत्यक्ष सहभागी होणे याचीही त्यांना जाणीव आहे.

अनसूयाचे काळे यांच्याशी लग्न होण्यापूर्वी एका गृहस्थाशी लग्न ठरून मोडले होते. तिला पत्रकार होण्याची महत्त्वाकांक्षा होती. पण ते लग्न त्यांच्या भावाने ठरवले होते. भावानेच लग्न ठरवून ते मोडले तेव्हा ते म्हणतात, ''पण ठरलेले लग्न मोडणे यात मुलींना कमीपणा वाटतो. या घटनेचा अनसूयाच्या मेंदूवर वाईट परिणाम झाला.''[१०] यातून पत्नीच्या मनाचा विचार करण्याची त्यांची वृत्ती दिसते.

अनसूयाबाईंचा धाकटा भाऊ काशिनाथ याचा बुडून मृत्यू झाला आणि त्यांची धाकटी बहीण वत्सला आणि वहिनी प्लेगला बळी पडल्या. त्यांची आठवण त्या काढत तेव्हा ''मेलेल्या माणसांबद्दल अधिक प्रेम वाटते म्हणून म्हणा किंवा ती तशीच गुणी होती म्हणून म्हणा, पण बाई शेवटपर्यंत काशिनाथ व वत्सला या भावंडांबद्दल हळहळत असत.''[११] यावरून किंवा बाईंच्या काँग्रेसमधील कार्यांचा आढावा घेताना ते म्हणतात, ''बाईंनी स्वतः काँग्रेसमध्ये कार्य केले. पण मध्यमवर्गीय स्त्री कार्यकर्त्यांना त्यातही शिकलेल्या स्त्री कार्यकर्त्यांना अथवा स्पष्टच बोलायचे म्हणजे पांढरपेशा स्त्री कार्यकर्त्यांना त्या काँग्रेसमध्ये ओढून शकल्या नाहीत.''[१२] यावरून एखाद्या घटनेबद्दल सारासार विचार करण्याची वृत्ती, बाईमधील गुणांचा उल्लेख करताना त्यांची उणीवही दाखवणे ही समतोलवृत्ती दिसते.

काळे केवळ अनसूयाबाईंच्या मनाचा विचार करून त्यांच्या मताचा आदर दाखवून किंवा त्यांना आर्थिक स्वातंत्र्य देऊन त्यांना व्यक्ती म्हणून मान्यता देतात असे नव्हे तर बाईंच्या माहेरच्या घरातील वातावरण पाठांतराला, व्यासंगाला, बहुश्रुतपणाला अनुकूल होते. तर काळे यांच्या घरात फारसे कोणी शिकलेले नव्हते, राहण्याची पद्धत जुनी त्यामुळे ''लहानपणी आईबरोबर सकाळी मी ज्या काय भूपाळ्या म्हणत असे, तेवढेच माझे पाठांतर होते. माझ्यापेक्षा बाईंची संस्कृत, मराठी अथवा इंग्रजी वाङ्मयावरील झेप फार मोठी होती. त्यामुळे माझ्यातील हे वैषम्य त्यांना जामवत असे, वाङ्मयीन रसास्वाद बाईंच्या बरोबरीने घेण्यास मी असमर्थ होतो.''[१३] किंवा ''शिवाय मी भोळा (redulous) बोलण्यातही व्यंग''[१४] किंवा ''बाई उत्तम व अस्खलित बोलणाऱ्या तर मी बोबडा, बाई जास्त व्यवहारी, हात राखून खर्च करणाऱ्या तर मी उधळा, पुरुषांना शत्रू जास्त, बायकांना कमी शिवाय बाई वागण्यात हुशार, सहसा कोणाच्या आहारी न जाणाऱ्या व प्रसंगी फटकून बोलणाऱ्या आणि वागणाऱ्या.''[१५] अशा शब्दात बाईंच्या तुलनेत आपल्यातील कमीपणा मान्य करतात. येथेही पत्नी आपल्यापेक्षा गुणांमध्ये वरचढ आहे हे मान्य करण्यास कचरत नाहीत. एवढेच नव्हे तर आपल्यापेक्षा बाईंमध्ये असलेल्या वरचढ गुणांचे त्यांना कौतुक वाटते.

बाईंनी निवडलेल्या सुमतिबाई धनवटे, उषाताई कोलते, कुसुमताई वानखेडे यांसारख्या सहकाऱ्यांच्या निवडीविषयी काळे समाधान व्यक्त करतात. तसेच त्यांच्या पुरुष सहकाऱ्याविषयीही आदराचे उद्गार काढतात. भाईजी बियाणी, श्री सैवाल, आर. एन. पांडे, माधवराव देसाई, नरकेसरी अभ्यंकर, डॉ. खेर या बाईंच्या सहकारी मित्रांशी काळेही सलोख्याचे संबंध ठेवतात. तर बाईंचा मत्सर करणारे

पुरुषही आहेत. याची जाणीव ठेऊनही ते त्यांची नोंद घेतात. त्यात मावळणकर, डॉ. जीवराज मेहता यांचा समावेश आहे.

काळे यांचा बाईंच्या सहकाऱ्याकडे बघण्याचा दृष्टिकोन कसा होता यावर प्रकाश टाकणारा एक प्रसंग ते आत्मचरित्रात सांगतात. १९३४ च्या डिसेंबरात नरकेसरी अभ्यंकर यांच्या शेवटच्या आजारात त्यांना भेटण्यासाठी बाई आणि काळे अभ्यंकरांकडे गेले. तेथे महात्माजी होते. त्यांनी बाईंना 'वैष्णव जन' हे भजन म्हणावयास सांगितले. तेव्हा बाईंनी ते म्हटले. भजन म्हणताना अभ्यंकरांची दृष्टी बाईंवर स्थिर झाली. काळ्यांना वाटले अभ्यंकरांचा आत्मा घुटमळत असल्याने त्यांना शांत मृत्यू यावा म्हणून बाईंनी त्यांना एक मुका द्यावा. यावर बाईंनी "ते तसे नाही. मी त्यांची निराशा केली. त्यांच्या म्हणण्यानुसार मी पूर्णत्वाने राजकारणात पडले नाही व आपल्यामागे नागपूरच्या राजकारणात पूर्ण अंधार आहे, असा विचार आल्यामुळे त्यांना वाईट वाटत आहे."[१६] यानंतर अभ्यंकरांना मुबईला उपचारासाठी नेण्यात आले. त्यात त्यांचा मृत्यू झाला. या प्रसंगाबद्दल ते 'माझी भूमिका' मध्ये म्हणतात, "माझी संस्कृती आणि विचारांची दिशाही पाश्चिमात्य वळणाची आहे. आसन्नमरण माणसाची इच्छा तृप्त करणे हे पवित्र कर्तव्य मानलेले आहे."[१७] यातून मृताचा आत्मा शांत करण्याबरोबर आपण उदार मनाचे आहोत असे दाखवण्याचा प्रयत्न ते करतात. पण मनात मत्सराची भावना निर्माण झाल्यावर त्यावर विचारांनी नियंत्रण ठेवता येत नाही. असेही दिसते. डेप्युटी कमिशनर मॅक्घलागन या आयरिश गृहस्थांप्रमाणेच बाईंचा भाऊ दिसायचा. त्यामुळे त्यांच्या मनात मॅक्घलागन विषयी आदर व प्रेम उत्पन्न झाले. तसे बाईंनी काळे यांना सांगितले. त्यात लैंगिक भावना नव्हती तरी त्यामुळे काळे यांची मत्सर जागृत झाला. त्यांची बेचैनी कमी न झाल्याने शेवटी बाईंनी त्यांच्याशी असलेले संबंध हलके हलके तोडून टाकले. या प्रसंगातून पारंपरिक पुरुषाप्रमाणे आपल्या पत्नीवर आपलीच मालकी असावी अशी काळे यांची भावना दिसते.

असे असले तरी काही ठिकाणी मात्र काळे यांच्यातील पारंपरिक पुरुष डोके वर काढताना दिसतो. ज्यांनी त्यांचे लग्न जमवण्यासाठी प्रयत्न केले त्या बाबासाहेब लिमये यांनी अग्नीशी लग्न करीत आहोत असे सांगितल्यावर 'सेल्फ वुईल्ड' स्त्रीशी लग्न करीत आहोत. त्यांनी उत्तर दिले. "मी अग्नी विझवणार नाही मी त्याला काबूत आणीन. 'सेल्फ वुईल्ड' माणसाच्या हातूनच काही कार्य होऊ शकते."[१८] अग्नीप्रमाणे असणाऱ्या पत्नीला काबूत आणणे यातच आपला पुरुषार्थ आहे असा पारंपरिक विचारच येथे दिसून येतो.

तसेच अनसूयाबाई कऱ्हाडे असल्यामुळे वेदोक्त ब्राह्मण त्यांचे लग्न लावण्यास तयार नव्हते. अनसूयाबाईंचा भाऊही लग्नास आला नाही. अनसूयाने केलेला स्वयंपाक आईने खावा म्हणून त्यांना ऋतू शांतीचा होम करावा लागला. याचा उल्लेख करून ते म्हणतात, "या दहा पंधरा दिवसात मला निदान तीन-चार प्रसंगी तरी दुष्टान्तासारखे सहज वागता आले असते. ज्या मुलीला मी माझ्या हृदयाची स्वामिनी म्हणून अंगिकारली तिचे कौमार्य धर्मसंस्कारापूर्वी भ्रष्ट न करण्याची ताकद माझ्यात होती."[१९]

येथे काळे स्वतःच्या वर्तनाचे उदात्तीकरण करून आपण अनसूयाबाईंशी लग्न केले म्हणजे उपकारच केले अशी भावना दिसते.

तसेच लग्नानंतरही सतत कडाक्याची भांडणे होऊनही आमची एकमेकांवरची प्रीति कायम होती असे सांगतात कारण देताना, ''मी त्यांना माझी देवता समजत होतो म्हणून त्यांच्यावरचे माझे प्रेम अखेरपर्यंत तसेच कायम टिकले.''[२०] असे देतात. परंपरागत स्त्री पुरुष कल्पनांमध्ये स्त्री ला देवता कल्पून तिची पूजा केली जाते याच विचारसरणीचा प्रभाव काळे यांच्यावर दिसतो.

आपल्या मनात अनसूयाविषयी आदर का निर्माण झाला हे सांगताना ते आपल्या आईची वैधव्यानंतरची स्थिती सांगून याची चर्चा यापूर्वी आली आहे. ते म्हणतात. ''या सर्व गोष्टींचा माझ्या मनावर फार परिणाम झाला. मला घराचा तिटकारा आला आणि स्त्री जातीबद्दल ती अबला असल्यामुळे, माझ्या मनात विलक्षण आदर उत्पन्न झाला. तोच आदर मला पुढे अनसूयाशी वागताना उपयोगी पडला.''[२१] स्त्री अबला म्हणू न तिचे संरक्षण करणे ही पुरुषाची जबाबदारी असण्याची विचारसरणी दिसते. खरे तर स्त्री अबला असल्यामुळे आदर निर्माण होणे हीच विसंगत भावना आहे. अबलेबद्दल वाटते ती सहानुभूती. स्त्रीवाद स्त्रियांसाठी अशी सहानुभूती असणे नाकारतो.

त्यांना सात वर्षात पाच मुले झाली. बाळंतपणामुळे बाईंना शारीरिक त्रास होत नसला तरी त्यांना बाळंतपणाचा कंटाळा आला. अशात सहावे मूळ झाल्यानंतर बाईंनी कुटुंबनियोजनाचे उपाय पाहण्यास सुरुवात केली. पण काळे 'निसर्गाने घालून दिलेले नियम उल्लंघू नयेत म्हणून' त्याविरुद्ध होते पण डॉ. मेरी स्टोप आणि डॉ. विश्वेश्वर अय्यांच्या पुस्तकाच्या वाचनाने त्यांचे मत बदलले (मात्र ते पत्नीच्या शरीरस्वास्थासाठी नव्हे तर ते मटेरियालिस्ट म्हणून Appaling संततीची वाढ हिंदुस्थानच्या दुर्दैवाला व दारिद्रयाला कारणीभूत म्हणून) त्यांनी कॉंट्रासेप्टिव्हज वापरण्यास सुरुवात केली पण तरी सातवे मूल झाले. शेवटचे मूल बाई ३५ वर्षांच्या असताना झाल्यावर जास्त मूले नकोत म्हणून त्यांना व्हॅसेकटोमिचे ऑपरेशन करुन घेतले. कुटुंबनियोजन करण्यामागची त्यांची वृत्ती पाहिली तर 'बाईंना काहीतरी सार्वजनिक काम करण्याची तळमळ लागून राहिली होती.'[२२] म्हणून त्यांनी काही साधने वापरली तरी नंतर मात्र जास्त मुले नकोत, देशाचे दुर्दैव व दारिद्रय यांचा प्रभाव पडूनच ते संततिनियमनाची शस्त्रक्रिया करताना दिसतात.

बाईंच्या शेवटच्या आजारातही त्यांची शुश्रुषा करण्याची संधी आपणास मिळाली असे म्हणतात. खरे तर सहधर्मचारी या नात्याने ते त्यांचे कर्तव्यच होते पण येथे मात्र ते शुश्रुषेचे श्रेय स्वतःकडे घेतात.

पत्नीच्या कर्तृत्वास वाव देणारे, त्या राजकारण समाजकारणात पडल्यावर सर्व तऱ्हेची मदत करणारे, बाईंच्या स्त्रीवादी विचारांशी जुळणाऱ्या मतांचा आदर करणारे मुलाच्या औरसपणाबद्दल बाईंशी वाद घालणारे स्वतःचेही स्त्रीवादी विचाराशी साम्य असणारे काळे यांच्यात पारंपरिक पुरुषी अहंकारही काही प्रमाणात आढळतो. स्त्रियांना आदर देण्यामागचे त्यांचे कारण स्त्रीवाद विरोधी असल्याचे जाणवते. काळे यांच्या व्यक्तिमत्वास अशी विसंगती दिसून येते. कारण ते ज्या काळात वावरले.

त्या काळात आजच्या स्त्रीवादी विचारांचा उगमही झालेला नव्हता. उच्चवर्णीय स्त्रियांच्या उद्धारासाठी म्हणून इंग्रजी शिक्षणाने व विचाराने समाजसुधारकांनी सुरुवात केली होती. त्यात त्यांच्या उद्धाराची भावना असले तरी स्त्रीपुरुष समानतेची भावना नव्हती. केशवपन, बालविवाहासंबंधी विधवांच्या पुनर्विवाहास उत्तेजन, स्त्रियांच्या शिक्षणास उत्तेजन देणे असा मर्यादित हेतू त्यामागे होता. परंतु स्त्रियांकडे देवता म्हणून पाहण्याची पारंपरीक दृष्टी मात्र बदलली नव्हती अशा काळात आपल्या पत्नीच्या मनाचा, मतांचा विचार करुन तिच्या कर्तृत्वास प्रोत्साहन देणारे, वाव देणारे काळे त्यांच्या काळाच्या पुढेच गेले आहेत असे दिसते. त्या वेळची परिस्थिती लक्षात घेता पत्नीच्या परंपरेच्यादृष्टीने स्त्रीस्वभावास न शोभणाऱ्या गुणांचे कौतुकच करून त्यांच्या व्यक्तिमत्वास खीळ न घालता ते फुलवण्याची त्यांची वृत्ती कौतुकास्पद आहे.

'माझी भूमिका' मध्ये ते म्हणतात. ''पत्नीने जर पतीकडे आपला अन्नदाता, रक्षक किंवा मुलांचा जनक याच नात्याने केवळ पाहिले तर वैवाहिक जीवनात कधी गोडी उत्पन्न होणारच नाही. आपल्या पतीची आपण अर्धांगी आहोत. म्हणजेच आपले आणि त्याचे नाते बरोबरीचे आहे, अशी तिची भावना असावयाला हवी. तसेच नवऱ्याने आपल्या बायकोला रखेली, दासी किंवा गुलाम आहे असे समजता कामा नये. लग्न होण्यापूर्वी पतीपत्नीचे संबंध आणि वैवाहिक जीवन यांच्यासंबंधी माझी धारणा अशा प्रकारची घेऊन गेलेली होती.''[२३] यावरूनही त्यांची वृत्ती स्त्रीवादाशी बरीचशी मिळतीजुळती असल्याचे दिसून येते.

## संदर्भ-सूची


१) काळे पु.बा., अनसूयाबाई आणि मी, (संपा. प्रा. सुरेश डोळके), स्वतः, १९६२. पृ. १६१.
२) तत्रैव. पृ. २६-२७
३) तत्रैव. पृ. ४५
४) तत्रैव. पृ.
५) तत्रैव. पृ. ९३
६) तत्रैव. पृ. ५८
७) तत्रैव. पृ. १०३
८) तत्रैव. पृ. ७२
९) तत्रैव. पृ. ११८
१०) तत्रैव. पृ. ४३
११) तत्रैव. पृ. ३६
१२) तत्रैव. पृ. १०२-१०३
१३) तत्रैव. पृ. ३५
१४) तत्रैव. पृ. ८४
१५) तत्रैव. पृ. ८७
१६) तत्रैव. पृ. १०५
१७) तत्रैव. पृ. (माझी भूमिका) बत्तीस

१८) तत्रैव. पृ. ४५
१९) तत्रैव. पृ. ४६
२०) तत्रैव. पृ. ७३
२१) तत्रैव. पृ. २७
२२) तत्रैव. पृ. ६६
२३) तत्रैव. पृ. (माझी भूमिका) चौतीस

❑ ❑ ❑

# परिशिष्ट-२

# आत्मचरित्रांची सूची

*आधारभूत आत्मचरित्रे*


१. अत्रे प्र.के., कऱ्हेचे पाणी खंड १, परचुरे प्रकाशन मंदिर, पहिली आवृत्ती ६३, पाचवी आवृत्ती ९१.
२. अत्रे प्र.के., कऱ्हेचे पाणी खंड २, परचुरे प्रकाशन मंदिर, पाचवी आवृत्ती १९९६.
३. अत्रे प्र.के., कऱ्हेचे पाणी खंड ३, परचुरे प्रकाशन मंदिर, चौथी आवृत्ती १९९४.
४. अत्रे प्र.के., कऱ्हेचे पाणी खंड ४, परचुरे प्रकाशन मंदिर, चौथी आवृत्ती १९९५.
५. अत्रे प्र.के., कऱ्हेचे पाणी खंड ५, परचुरे प्रकाशन मंदिर, चौथी आवृत्ती १९९५.
६. अभ्यंकर नाना, अंतरीच्या नाना कळा, के. भी. ढवळे, ध.बा. ढवळे, १९७१.
७. कातगडे पुंडलीकजी, पुंडलीक, वि. ज. सहस्त्रबुद्धे, १९५०.
८. किर्लोस्कर शं. वा., शंवाकीय, किर्लोस्कर प्रेस, १९७४.
९. कुलकर्णी कृ. पां., कृष्णाकाठची माती, भारती प्रकाशन, १९६१.
१०. कुलकर्णी श्रीधर रंगनाथ, नवरात्र संपले सिंधू पब्लिकेशन, १९७३.
११. कुंटे नाना, वाटचाल, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, १९८२.
१२. केळकर काशिनाथ नरसिंह, वाळवंटातील पाऊले, ग. ल. ठोकळ, १९६३.
१३. केळकर मनोहर माधव, स्वभावाला औषध नाही आणि दैवापुढे गती नाही कॉन्टिनेंटल प्रकाशन १९८४.
१४. कोल्हटकर चिंतामण गणेश, बहुरुपी, ह. वि. मोटे प्रकाशन, १९५७.
१५. खांडेकर वि.स., एका पानाची कहाणी, देशमुख आणि कंपनी १९८१.
१६. गाडगीळ नरहर विष्णू, पथिक भाग - १, व्हीनस प्रकाशन, १९६४.
१७. गाडगीळ नरहर विष्णू, पथिक भाग - २, व्हीनस प्रकाशन, १९६५.
१८. गाडगीळ नरहर विष्णू, पथिक भाग - ३, व्हीनस प्रकाशन, १९७०.
१९. गोखले गंगाधर निळकंठ, माझे आयुष्याचा चित्रपट, स्वतः १९५०.
२०. गोगटे वामन बाळाजी, माझे जीवन, अरविंद प्रकाशन, १९५८.
२१. गोगटे वासुदेव बळवंत, हॉटसन-गोगटे आत्मवृत्त, विद्यार्थीगृह प्रकाशन, १९७२.
२२. गोडबोले द.शं., बांधिलकीची वाटचाल,
२३. घाटे वि. द., दिवस असे होते, मौज प्रकाशन, १९६१.
२४. घाणेकर भास्कर गोविंद, आत्मनिवेदन आणि हिंदूविश्वविद्यालयदर्शन, य. वि. नामजोशी, १९७२.
२५. घारपुरे न.का., विकास की विचका? प्रपंच प्रकाशन, १९८५.
२६. चव्हाण यशवंतराव, कृष्णाकाठ, प्रेस्टीज प्रकाशन, नवी आवृत्ती १९८७.
२७. चिटणीस ग.य., माझ्या आठवणी पॉप्युलर प्रकाशन, १९५५.
२८. चिरमुले गो.वि., मी गोपाळकृष्ण, सौ.कमला गो. चिरमुले, १९८५.
२९. चोरघडे वामन, जडणघडण, कॉन्टिनेंटल प्रकाशन, १९८१.
३०. जोशी महादेवशास्त्री, आत्मपुराण, अनमोल प्रकाशन, १९८५.
३१. जोशी मोरेश्वर वासुदेव, एका पथिकाची जीवनयात्रा, पॉप्युलर प्रकाशन, १९६४.
३२. जोशी श्रीपाद, उलगा उलग, कॉन्टिनेंटल प्रकाशन, १९८३.
३३. झोळ रा.ना., रामप्रहर, उत्कर्ष प्रकाशन, १९८५.
३४. ठाकरे प्रबोधनकार, माझी जीवनगाथा, सोमैय्या प्रकाशन, १९७३.
३५. ताम्हाणे ग.बा., कोकणची पाऊलवाट अश्विनी प्रकाशन, १९८२.
३६. तोरडमल मधुकर, तिसरी घंटा, मॅजेस्टिक प्रकाशन'', १९८५.
३७. दसनूरकर द. गो., माझे जीवन प्रभूची कीर्ती, प्रपंच प्रकाशक, १९७५.
३८. दातार दिनकर घनःश्याम, आत्मकथा मंजूषा, दिनकर दातार, १९८४.

३९. दांडेकर गोपाळ निळकंठ, स्मरणगाथा, मॅजेस्टिक बुक स्टॉल, १९७३.
४०. देव शंकरराव, दैव देते पण कर्म नेते, सुलभ मुद्रणालय, १९७६.
४१. देशपांडे गंगाधरराव, माझी जीवनकथा, मौज प्रकाशन, १९६०.
४२. देशपांडे ह.शं., आव्हान, देशमुख आणि कंपनी, १९८४.
४३. देसाई वसंत शांताराम, अशीच एकाची गोष्ट, सोमैया प्रकाशन, १९७१.
४४. धनवटे दत्ताजी रामजी, माझी जीवनकथा, धनवटे आश्रम, १९५१.
४५. पगडी सेतूमाधवराव, जीवनसेतू, कॉन्टिनेंटल प्रकाशन, १९६९.
४६. पटवर्धन ना.म. विरंगुळा व्हीनस प्रकाशन, १९६०.
४७. परुळेकर दादासाहेब, माझ्या आयुष्यातील आठवणी, स्वतः, १९६०.
४८. पाटणकर ना. वि., समाधान, व्हीनस प्रकाशन, १९६२.
४९. पाटील पां.चि., माझ्या आठवणी, मौज प्रकाशन, १९६४.
५०. पाठक यशवंत, अंगणातले आभाळ, ग्रंथाली वाचक चळवळ, १९८५.
५१. पिंगे द. रा. माझी वाटचाल, द. रा. पिंगे १९५४.
५२. पेंडसे श्री.ना. लेखक आणि माणूस, मौज प्रकाशन, १९७४.
५३. पैंगीणकर राजाराम रंगाजी, मी कोण?, भाग - १, गोमंत छापखाना, १९६९.
५४. पैंगीणकर राजाराम रंगाजी, मी कोण?, भाग - २, गोमंत छापखाना, १९७१.
५५. फडके नारायण सीताराम, माझं जीवन एक कादंबरी, कुलकर्णी ग्रंथागार, १९६९.
५६. फडके सुधीर, कोठे आणि कधीतरी, राजहंस प्रकाशन, १९७२.
५७. बागल माधवराव, जीवनप्रवाह, स्वतः, १९५४ (दोन खंड एकत्रित)
५८. बाबर कृ.भा., एक शिक्षकाची कथा, ठोकळ प्रकाशन, १९६२.
५९. बेडेकर वासुदेव विश्वनाथ, बेडेकर जीवन-वृत्तांत, श्यामला प्रकाशन, १९६१.
६०. बेडेकर विश्राम, एक झाड आणि दोन पक्षी, पॉप्युलर प्रकाशन, १९८४.
६१. बेहरे ग. वा., आनंदयात्रा, श्रीविद्या प्रकाशन, १९८३.
६२. भट दत्ता, झाले मृगजळ आता जलमय, आरती प्रकाशन, १९८३.
६३. भागवत मा.ल., मी एक निमित्तमात्र, मॅजेस्टिक बुक स्टॉल, १९८५.
६४. भावे पु.भा., प्रथमपुरुषी एकवचनी, खंड १, विश्वमोहिनी प्रकाशन, १९८०.
६५. भावे पु.भा., प्रथमपुरुषी एकवचनी, खंड २, विश्वमोहिनी प्रकाशन, १९८३.
६६. भावे पु.भा., प्रथमपुरुषी एकवचनी, खंड ३, विश्वमोहिनी प्रकाशन, १९८६.
६७. भोळे केशवराव, जे आठवते ते, प्रेस्टिज प्रकाशन, १९७४.
६८. माटे श्री. म., चित्रपट - मी व मला दिसलेले जग व्हीनस प्रकाशन, १९५७.
६९. मायदेव वा.गो., वेचलेले क्षण, व्हीनस प्रकाशन, १९६२.
७०. मोटे ह. वि., एक सर्वमंगल क्षिप्रा, खंड १, ह.वि. मोटे, १९८०.
७१. मोटे ह. वि., एक सर्वमंगल क्षिप्रा, खंड २, मॅजेस्टिक बुक स्टॉल, १९८४.
७२. मोडक अ. वा., आत्मारामाची वाटचाल, दे. भ. मोडक गुरुजी, जिल्हा सत्कार समिती प्रकाशन, १९६५.
७३. मोडक विश्वनाथ आबाजी, माझ्या आयुष्याचे अवलोकन, माझी जीवनकथा, वि. आ. मोडक, १९७२.
७४. मिरजकर एस.एस., अंधारातून प्रकाशाकडे, लोकवाङ्मयगृह, १९८०.
७५. राजवाडे आहिताग्नि, आहिताग्नि राजवाडे आत्मवृत्त, श्रीविद्या प्रकाशन, १९८०.
७६. रेगे शि. द., माझे जीवन : माझी बाळं, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती, १९८३.
७७. वाटवे के.ना., माझी वाटचाल, जोशी आणि लोखंडे प्रकाशन, १९६४.
७८. वाटवे गजानन, गगनि उगवला सायंतारा, प्रपंच प्रकाशन, १९७१.
७९. व्हटकर नामदेव, कथा माझ्या जन्माची, मॅजेस्टिक बुक स्टॉल, १९८३.
८०. शास्त्री यशवंत बाळाजी, आठवणी प्रेस्टीज प्रकाशन, १९७५.
८१. सरदेसाई गो. स., माझी संसारयात्रा, के. भी. ढवळे, १९५६.
८२. सहस्रबुद्धे अण्णासाहेब, माझी घडण, साधना प्रकाशन, पहिली आवृत्ती १९५७, दुसरी आवृत्ती १९६३.
८३. साधले आनंद, मातीची चूल, सुनंदा प्रकाशन, १९७०.

८४. सावरकर वि.दा., समग्र सावरकर वाङ्मय खंड-१, समग्र सावरकर वाङ्मय प्रकाशन समिती, १९६३.
८५. सूर्यवंशी स. ना., अगा जे कल्पिले नाही मंगल साहित्य प्रकाशन, १९७५.
८६. क्षीरसागर श्री. के., तसबीर आणि तकदीर, पॉप्युलर प्रकाशन, १९७६.

# दलित आत्मकथने

१. अचलखांब रुस्तम, गावकी, श्रीविद्या प्रकाशन, पहिली आवृत्ती १९८३, दुसरी आवृत्ती १९९७.
२. कोंडविलकर माधव, मुक्काम पोस्ट : देवाचे गोठणे मॅजेस्टिक बुक स्टॉल, १९७९.
३. खरात शंकरराव, तराळ-अंतराळ, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पहिली आवृत्ती १९८१, दुसरी आवृत्ती १९८८.
४. झोडगे ना.सं., फांजर, सौ. सिंधू झोडगे, १९८२.
५. तलवारे श्रीरंग, धुळपाटी, मानसन्मान प्रकाशन, १९८५.
६. तुपे उत्तम बंडू, काट्यावरची पोटं, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९८१.
७. पवार दया, बलुतं, ग्रंथाली प्रकाशन, पुनर्मुद्रण, १९९३.
८. पोळके पार्थ, आभरान, ग्रंथाली वाचक चळवळ, १९८४.
९. माने लक्ष्मण, उपरा, प्र. आ. १९८०, पुनर्मुद्रण १९९३.
१०. मोरे दादासाहेब, गबाळ, श्रीविद्या प्रकाशन, दुसरी आवृत्ती १९९०.
११. लिंबाळे शरणकुमार, अक्करमाशी, श्रीविद्या प्रकाशन, १९८४.
१२. सोनकांबळे प्र.ई., आठवणीचे पक्षी, चेतना प्रकाशन, दुसरी आवृत्ती १९८१.

# आत्मचरित्रपर आणि व्यवसायाशी संबंधित लेखन

१. आपटे गो.ल., माझ्या व्यवसायातील गंमती जमती, महाराष्ट्र प्रकाशन, १९६६.
२. आपटे वा.शि., रुखरुख, दा.ना. मोघे प्रकाशन, १९४८.
३. आठवले पार्वतीबाई माझी कहाणी, प्रकाशक गो. म. चिपळूणकर, १९२८.
४. करंदीकर रघुनाथ पांडुरंग, रघुनाथ पांडुरंग उर्फ दादासाहेब करंदीकर यांची दैनंदिनी, वि.र. करंदीकर, १९६२.
५. कर्णिक द्वा.भ., संपादकाचे जीवनस्वप्न, किर्लोस्कर प्रेस, १९५२.
६. कशाळीकर श्रीनिवास, भोवरा, चिंतामणी साहित्य सहयोग सहकारी प्रकाशन संस्थेकरीता, सुधारित आवृत्ती १९९१.
७. काणेकर अनंत, अनंतिका, श्रीविद्या प्रकाशन, १९७९.
८. कामत जनार्दन विष्णू, सत्तरीतील पन्नाशी, ज.वि. कामत सत्कार समितितर्फे प्रकाशित, १९५७.
९. कार्लेकर शिवाजी शंकरराव, सर्कशीच्या रिंगणात, मॅजेस्टिक बुक स्टॉल, प्रथम आवृत्ती १९५९, दुसरी आवृत्ती १९६४.
१०. कालेलकर मधुसूदन, मधुघट रंजना प्रकाशन, १९८५.
११. * काळे पुरुषोत्तम बाळकृष्ण, अनसूयाबाई आणि मी, व्हीनस प्रकाशन, संपा. सुरेश डोळके.
१२. कुलकर्णी म. तु., आत्मगत कथा व व्यथा, स्वतः, प्रथम आवृत्ती१९८५., दुसरी आवृत्ती १९८९.
१३. केळकर नरसिंह चिंतामण, माझा जन्मभरचा एक उद्योग, अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, १९५९.
१४. कोकणे विलासराव (पारगावकर), एका सैनिकाची कहाणी, साकेत प्रकाशन, १९८४.
१५. * कोरे तात्यासाहेब मी : एक कार्यकर्ता मा. तात्यासाहेब कोरे षष्ठ्यब्दिपूर्ती समारंभ समिती प्रकाशन, १९७४. शब्दांकन - प्रा. विजय पानसरे, प्रा. मुकूंद दातार.
१६. कोवाडकर य.स., लाईन क्लिअर, व्हीनस प्रकाशन, १९६६.
१७. * कोसंबी धर्मानंद, आचार्य धर्मानंद कोसंबी यांचे आत्मचरित्र आणि चरित्र दि गोवा हिंदू असोसिएशन प्रकाशन, १९७६, संपा. ज.स. सुखटणकर.
१८. गाडगीळ श्री.वि., रोजनिशीतील पाने, स्वतः, १९६५.
१९. गाडगीळ श्री.वि., कवडसे, स्वतः, १९६८.
२०. गोडसे गोपाळ, गांधी हत्या आणि मी, रविराज प्रकाशन, १९६७, आवृत्ती नववी १९९२.
२१. गोरे ना.ग., नारायणीय.

२२. गोवंडे गंगाधर कृष्ण, स्मृतिविहार, सौ. वैदेही श्रीराम लोखंडे, १९७५.
२३. चव्हाण यशवंतराव, ऋणानुबंध, प्रेस्टिज प्रकाशन, १९७९.
२४. चापेकर शं.नि., स्मृतिधन, मौज प्रकाशन, १९६६.
२५. चाफेकर शं.गं., चाळिशीच्या चष्म्यातून, १९४९.
२६. चित्रे दिलीप पुरुषोत्तम, शीबाराणीच्या शोधात, मॅजेस्टिक बुक स्टॉल, १९७१.
२७. जागीरदार गजानन, संध्याकाळ, राजहंस प्रकाशन, १९७१.
२८. जोग प्र.बा., मी हा असा आहे प्रमिला प्रभाकर जोग, १९५९.
२९. जोग प्र.बा., मी हा असा भांडतो प्रमिला प्रभाकर जोग, १९६५.
३०. * जोशी एस.एम., मी एस.एम., कॉन्टिनेंटल प्रकाशन, १९८४.
३१. जोशी के.बी., माझा उद्योगधंदा व त्यातील अनुभव, के.बी.जोशी,
३२. जोशी जी.एन., स्वरगंगेच्या तीरी, मॅजेस्टिक बुक स्टॉल, १९७७.
३३. जोशी महादेवशास्त्री, आमचा वानप्रस्थ, कॉन्टिनेंटल प्रकाशन, १९८३.
३४. जोशी रा.भि., साठवणी, मौज प्रकाशन, १९७९.
३५. जोशी य.गो., दुधाची घागर, प्रसाद प्रकाशन, १९७२.
३६. ठाकूर तुकाराम यशवंत, एका पोलीसाचे आत्मवृत्त, मनोहर प्रकाशन मंदिर, १९६४.
३७. ठोमरे उमाकांत, ठुमरी, कवडसे प्रकाशन, १९८२.
३८. तेंडूलकर द.वि., अमृतसिद्धी/छंदोपनिषद, मॅजेस्टिक बुक स्टॉल, १९८५.
३९. देशमुख वसंत, सरकारी दिवस, मुक्ता प्रकाशन, १९८२.
४०. देवगिरीकर त्र्यं.र, राजकीय आठवणी चित्रशाळा प्रेस प्रकाशन, १९६१.
४१. धर्माधिकारी चंद्रशेखर, माणूसनामा, चेतश्री प्रकाशन, १९८५.
४२. धर्माधिकारी दादा, दादांच्या शब्दात दादा परंधाम प्रकाशन, दुसरी आवृत्ती १९९२.
४३. धारिया मोहन, सफर, विश्वकर्मा साहित्यालय, १९७८.
४४. * धोंड प्रल्हाद अनंत, रापण, मौज प्रकाशन, १९७९, शब्दां. संभाजी कदम.
४५. नवलकर प्रमोद, आठवणी, माधुरी वसंत प्रभुदेसाई, १९८०
४६. नातू प्र.न., भिरभिरे, स्वतः, १९८३
४७. * नेवासकर राघवेंद्र गोपाळ, माझा आश्रयाचा खडक, रा.ना.हर्षे १९५८. सं.पा.
४८. पटवर्धन अरविंद, मी मुंबईचा पोलीस, दिलीप प्रकाशन, १९८०.
४९. पटेल बाबूराव, जीवनस्मृती, काही गोड : काही कडू, कुलकर्णी ग्रंथागार, १९७३.
५०. परुळेकर ना.भी., निरोप घेता सकाळ प्रकाशन
५१. परांजपे अ.ना., अळवावरचं पाणी, श्रीराम प्रकाशन, १९६२.
५२. पंडित सूर्यकांत सदाशिव, खंदक माझे घर, व्हीनस बुक स्टॉल, १९६४.
५३. पारखे म.स., जीवनाची वाटचाल, ज.आ. मोंडकर, १९७२.
५४. पी. विठ्ठल, माझे क्रिडाजीवन, भारती प्रकाशन, १९४८.
५५. * पुरंदरे बी.एन., शल्यकौशल्य, अश्वमेघ प्रकाशन, १९८३. (शब्दां. अनिकेत जोशी)
५६. पुराणिक द.स., संचार एका कुंचल्याचा, मेघना प्रकाशन, १९८२.
५७. पुरोहित वा.श्री., मराठी नाटके : माझा छंद, लोकहितवादी मंडळ नासिक प्रकाशन, १९६२.
५८. पेंढारकर बाबूराव, चित्र आणि चरित्र, श्री विशाखा प्रकाशन, १९६१.
५९. प्रधान श्रीधर, कसोटीचे क्षण, मनोरमा प्रकाशन, १९८३.
६०. फाटक नानासाहेब, मुखवट्यांचे जग, भारतीय रंगभवन १९६४.
६१. फुले निळकंठ रामचंद्र, याची देही याची डोळा, सुनंदा प्रकाशन, १९७७.
६२. बापट भालचंद्र गोपाळ, मी एक युद्धकैदी, विश्वमोहिनी प्रकाशन, १९८५.
६३. बेहरे ग. वा., पार्टी, मनोरमा प्रकाशन, १९८२.
६४. बोडस गणेश गोविंद, माझी भूमिका, महाराष्ट्र नाट्य मंडळ, १९४०.
६५. भट वासुदेव विष्णु, स्मृतिविशेष, स्वतः, १९७४.

६६. * भवाळकर केशव शिवराम, <u>रावसाहेब केशव शिवराम भवाळकर यांचे आत्मवृत्त</u> विदर्भ संशोधन मंडळ, १९६१, संपा. भवानीशंकर श्रीधर पंडित.
६७. * भागवत अ.ल., (योगीराज) <u>निरोप घेता घेता</u> सदानंद प्रकाशन, १९८३. शब्दांकन अरविंद पेंढारकर.
६८. भागवत ग.रा., <u>अर्धविराम</u>, सौ. आशा वसंतराव भागवत, १९६६.
६९. भालेराव अनंत, <u>पेटलेले दिवस</u>, श्रीविद्या प्रकाशन, १९८५.
७०. मयेकर वि.ना., <u>माझा काळा विजनवास</u>, प्रिया प्रकाशन,
७१. महाडिक नारायण, <u>कैदी नं. ३१४६७</u>, पॉप्युलर प्रकाशन, १९७४.
७२. माडगूळकर ग.दि., <u>वाटेवरल्या सावल्या</u>, विश्वमोहिनी प्रकाशन १९८१.
७३. * माने बापूराव, <u>माझे कलाजीवन</u>, मनोरमा प्रकाशन, १९८४.
७४. मावळणकर ग.वा., <u>काही पाऊले</u>, खंड १, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, १९४८.
७५. मावळणकर ग.वा., <u>काही पाऊले</u>, खंड २, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, १९५३.
७६. मेणजोगे सीताराम, <u>आम्ही पोस्टातली माणसं</u>, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, १९८५.
७७, * राजवांडे वि.का, <u>माझे विद्यार्थी जीवन</u>, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, १९६५, संपा. मु.गो.देशपांडे,
७८. लोकुरकर य.द., <u>उलटलेली पाने</u>, श्रीविद्या प्रकाशन, १९८४.
७९. * वरेरकर भा.वि. <u>माझा नाटकी संसार</u>, पॉप्युलर प्रकाशन, पहिली संपूर्ण आवृत्ती १९९५. संपा. कृष्णा करवार.
८०. शिंदे विठ्ठल रामजी, <u>माझ्या आठवणी व अनुभव</u>, र.बा. आंद्रे, भाग ३, १९५८.
८१. शिरवाडकर वि.वा., <u>वाटेवरल्या सावल्या</u>, कॉन्टिनेंटल प्रकाशन, १९७०.
८२. * सरवटे वि.सी., <u>माझा जीवनप्रवाह</u>, वि. वि. सरवटे, १९८५.
८३. * सरंजामे रघुनाथ दत्तात्रय, <u>स्मृतिवैचित्र्य</u>, नागपूर प्रकाशन, १९६४. संपा. ल.दा.नवरे)
८४. सुतार द.म., <u>प्रासाद आम्हा बंदीशाळा</u>, सोमैय्या पब्लिकेशन, १९६७.
८५. सुतार द.म., <u>सत्तरीच्या बुरुजावरून</u>, प्रिया प्रकाशन, १९८२.
८६. हुदलीकर सत्यबोध बाळकृष्ण, <u>माझ्या खडतर जीवनातील अनेक प्रसंग</u>, व्हीनस प्रकाशन, १९७९.

** अशी खूण केलेले ग्रंथ शब्दांकन केलेले किंवा संपादन केलेले आहेत.*

□ □ □

# परिशिष्ट -४

## *निर्देशसूची*

टीप - आत्मचरित्रकारांचा उल्लेख व्यक्तीसूचीत आला असल्याने ग्रंथनामसूचीत आत्मचरित्रांचा निराळा उल्लेख नाही.

### *ग्रंथनामसूची : -*


आगरकर वाङ्मय - ३०, ३१.
आंबेडकरी विचार आणि साहित्य - २४५.
कुण्या एकीचे अंतरंग - १५२.
गंगाधर गाडगीळ : व्यक्ती आणि सृष्टी - ९.
गांधीविचार दर्शन - २७
ग्रामीण साहित्य प्रेरणा आणि प्रयोजन - २४८.
चरित्र आत्मचरित्र : एक वाङ्मयप्रकार - १६.
चरित्रचिंतन - ९.
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्रासंगिक विचार - ३०.
डॉ. भिमराव रामजी आंबेडकर चरित्र - ३०.
दलित आत्मकथने : संकल्पना आणि स्वरूप - २४४.
दलित साहित्य : एक आकलन - २४८.
दलित साहित्य : एक सामाजिक सांस्कृतिक अभ्यास - २४४.
दलित साहित्य : चर्चा आणि चिंतन - २४३, २४७.
दलित साहित्याचे निराळेपण - २४३.
दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र - २४४.
दलित साहित्याच्या निमित्ताने - २४३.
दलित वाङ्मय : प्रेरणा आणि प्रवृत्ती - २४३, २४७.
दलित स्वकथने : संकल्पना आणि स्वरूप - २४४, २४६, २४७.
मराठी भाषा आणि साहित्य - १५.
मराठी विश्वकोश - ७, १०, १८.
मराठी संस्कृतीकोश - १२०.
महात्मा गांधीका शिक्षा दर्शन - २८.
महात्मा फुले : समग्र वाङ्मय - २४, २५.
वाङ्मयेतिहासाची संकल्पना - ३.
वाटा आणि वळणे - १०, ११.
साहित्य आणि सामाजिक संदर्भ - ८, ११.
स्त्री-पुरुष तुलना - २५, २६.
स्त्री-पुरुष सहजीवन - २९.
स्त्रीवादी समीक्षा : संकल्पना व उपयोजन - २८.
स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप आणि उपयोजन - २२.


### *विषयसूची : -*


अतिशयोक्ती - २१४-२१५.
अन्याय - ६६-६९, २५५-२५६, १०१-१०३, १७०-१७८.
अभ्यसनीय रूपे - ७३-७५, २०३-२०७.

अंधश्रद्धांना विरोध - २६४-२६५, २६६.
आईची शिक्षणास मदत - २६१-२६३.
आईचे घरातील अधिकार - २५४
आईच्या श्रद्धेकडे पाहण्याची दृष्टी - २६३-२६६.
आई-पत्नी संबंध - ७०-७३, ८४, २६८-२६९.
आईबद्दल नाराजी - ५३-५८.
आईबद्दलच्या भावना - २६६, २६७.
आत्मकथनाच्या मर्यादा - २४८.
आत्मचरित्र आणि इतर जवळचे वाङ्मयप्रकार - १०.
आत्मचरित्रांची पूर्वस्थिती - ११.
उदात्तीकरण - आई - ४०, ४१, ६१, ७३, ७४-७९, ८३. पत्नी - १७३, १९८, २०७-२०८, ३०५, ३१२, ३१३, ३१५, ३१६, ३२०, ३२७.
कृतीहीनता - ७५-७६.
गुणवर्णन - आई - ४३-५३, ८४, ९५-९६, २५०-२५४, २५६. पत्नी - १४९-१६१.
दुटप्पीपणा - १७६, १७८, १८२, २०४, २१२-२१४, २९०, ३०४, ३०५, ३१५.
पत्नीकडे पहाण्याचा दृष्टिकोन - १९८-२०२.
पत्नीचा कार्यात पाठिंबा - १६१-१६६.
पत्नीच्या अर्थार्जनाबाबत भूमिका - १४२-१४९.
पत्नीच्या निवडीचे निकष - १२१-१३५, २७९-२८९.
पत्नीच्या मृत्यूसंदर्भात लेखन - १९२-१९८.
पत्नीच्या शिक्षणाबाबत भूमिका - १३५-१४२.
पत्नीच्या स्वास्थाचा विचार - १८८-१९२.
पत्नीला गृहीत धरणे - २०८-२१०.
पत्नीविषयी तक्रार - १७९-१८८.
परंपरागतता - १४२-१४४, २२१, २२७, २२८.
पितृसत्ता - २१, ७०, ९८, २२९.
पुरुषप्रधान व्यवस्था - ५, ६९, ७३, ८४, ९८, १०१, १०३, १३५, १४२, १४४, १४६, १४८, १४९, १५३, १५४, १५५, १६१, १७३, १७४, १८३, १८४, १८५, १९२, १९८, २०४, २०८, २१६, २२०, २५९, २६७, २६९, २९९, ३११, ३१५, ३१९.
बहीण-पत्नी संबंध - १०३-१०५.
बहिणीबद्दल आदर - ९६-१००.
बहिणीबद्दल परिवर्तनशील मते - १०६-१११.
बहिणींबद्दल त्रोटक नोंदी - ९१-९५, २७०-२७२.
बहिणींबद्दल वाटणारा परकेपणा - ८६-९१.
बहिणींना मदत - २७२-२७८.
बहिणींमधील फरकाची नोंद - १००-१०१.
भारतातील स्त्रीवाद - २३, ३६.
मातृत्व - ८४, २०१, २०२.
मातृमाहात्म्य - ४०.
मातृवियोग - ६१-६६, २६७-
मुलींकडे पाहण्याची नवी दृष्टी - २२८-२३१.
मुलींचे कौतुक - २२३-२२८.
रूपवर्णन - आई - ४१-४३, ८३, २४९-२५०. पत्नी - १२३-१२५, १३१.
शिस्त/संस्कार - ४१-५१, २५९-२६१.
समाधानी जीवनाचे पत्नीस श्रेय - १६६-१७७.

सहजीवन - २८३-२८९.
सावत्र आई - ७९-८३.
सृजनात्मकतेचा नाकारलेला हक्क - २०२-२०३.
स्त्रीत्वाचे मिथक - २१०-२१२.
स्त्रीवादातील प्रवाह - १९, ३१, ३२, ३३, ३४.
स्वतंत्र अस्तित्व दाखवणाऱ्या स्त्रिया - २१५-२१८.

## *व्यक्ती सूची : -*

अचलखांब रुस्तम - २४५, २४९, २५४, २५५, २५६, २६१, २६२, २६३, २६६.
अत्रे प्र. के. - ४६, ५२, ५३, ६४, ६७, ७५, ७९, १२३, १३७, १४४, १९५, १९६, ३०३, ३०४, ३०७.
अभ्यंकर नाना - ४६, ४८, ४९, ५३, १२८, १५१, २२३, ३०३.
आगरकर गोपाळ गणेश - २४, २५, ३०, ३१.
आंबेडकर बाबासाहेब - २९, २६३, २६४, २६५, २७६, २७८.
उर्ध्वरेषे प्रभाकर - १२.
कर्वे धोंडो केशव - २५, २६, ३११.
कर्वे रघुनाथ - १८९, १९०, १९२, ३११.
कातगडे पुंडलीकजी - ४९, ८६, ८७, ८८, ८९.
किर्लोस्कर शं. वा. - ५६, ६५, १४४, १५५, १५६, १५७, १६५, १६६, १८१, १८२, १९६, ३१२.
कुलकर्णी कृ. पां. - ४१, ५७, ५८, ६७, १२१, १२२, १५०, १६७.
कुंटे नाना - ५८, ६०, ८०, ८१, ८२, १२६, १५१, १५४, १६१, १६८, २१२, २२८, २३१.
केळकर का. न. - ४०, ४७, १६६.
केळकर म. म. - ५१, ५२, ५४, ५८, १२५, १५२, १५७, १६३, १६६, १६७, २२१.
कोल्हटकर चिं. ग. - ४०, ४९, ७५, ८९, ९०, ३०२, ३०३, ३०७.
कोवाडकर य. स. - १४.
कोंडविलकर माधव - २५०, २५३, २५७, २६०, १६६, १६७, १७२, १७३, १८३, १८५,
खरात शंकरराव - १४३, २४७, २५१, २५२, २५३, २५४, २५९, २६०, २६१, २६२, २६५, २७०, २७५, २७६, २७८, २८०, २८१.
खांडेकर वि. स. - ४६, ५५, ५६, ५८, ६५, ६६, ६९, ३१३.
गाडगीळ गंगाधर - १४.
गाडगीळ न. वि. - ५८, ६०, १२३, १३२, १३७, १४४, १५०, १६१, १७२, १७३, १९४, १९६, २०२, २११, २१२.
गोखले गं. नि. - ४२, ३१३.
गोखले वामन बाळाजी - १२१.
गोगटे वासुदेव बळवंत (हॉटसन गोगटे) - ९२, ९३, १२६, १२७, १५७, १६७, १२५, २२७.
गोडबोले द. शं. - ४३, १२९, १३६, १४५, १६६, १८५, ३१२.
गोडसे गोपाळ - १३.
घाटे वि. द. - ६०, ६१, ७८, ७९, १४८, १९४, १९५, १९६, १९७, २०८.
घाणेकर भा. गो. - १२५, १४२, २००, २०१, ३००, ३०१, ३०७, ३१२.
घारपुरे न. का. - ४७, ५५, ६३, १०७, १०८, १३१, १३२, १४५, १५५, १५६, १७९, १८९, २०९.
चव्हाण यशवंतराव - ४४, १२३.
चिटणीस ग. य. - १२, ५२, ५३, ६३, १३९, १४५, १५६, १६२, १८०, ३१०.
चिटणीस लिला - ३१०, ३१५.
चिरमुले गो. वि. - ९६, ९७, १२२, २०१.
चोरघडे वामन - ४१, १२७, १२८, १५९, १९३, १९४, १९६, २०२, २२५, २२७.

जोशी महादेवशास्त्री - १३१, १५७, १६२, १६३, १९७, १९९, २००, २१८.
जोशी मो. वा. - ४८, ५१, ६२, १००, १०१, १२३, १४०, १४१, १५१, १५७, १६९, १९४, १९६, २१०, २११, २२४, २२७.
जोशी श्रीपाद - ४५, ५१, ५६, ५८, ६७, ६८, ८४, ९७, ९८, १२४, १३८, १५१, १६८, १७६, १७८, १८०, २१६, २१७, २२८, २२९, २३१, ३१३, ३१६.
झोळ रा. ना. - ७७, ७९.
झोडगे ना. सं. - २५१, २५६, २६२, २७६, २७७, २८२, २८३, २८९, २९०, २९१.
ठाकरे प्रबोधनकार - ५०, १२६, १६९.
तलवारे श्रीरंग - २४९, २५७, २६०, २६३, २६६.
ताम्हाणे ग. बा. - ४१, ४४, ६२, ६६, १२७, १५९.
तुपे उत्तम बंडू - २५२, २५८, २६०, २६३, २६६, २६७, २६८, २७३, २७४, २७५, २८०, २८१, २८५, २८६.
तोरडमल मधुकर - ४८, ७३, ७४, ७५, ८१, ८२, १४८, १५०, १६७, २०७, २०८.
दसनूरकर द. गो. - ६३, ७२, ८६, १२९, १३९, १४०, १४६, १५२, १५७, २०२, २०३, २०७, २०८.
दातार दि. घ. - ६२, ९१, ९५.
दांडेकर गो. नि. - ९१, ९४.
देव शंकरराव - ५८, ६०.
देशपांडे गंगाधरराव - ९१, १२१, १२२, १२३, १३७, १७६, १७७, १७८, २२३.
देशपांडे ह. शं. - १८३, १८४.
देसाई व. शां. - ४४, ४७, ६३, ७३, ९१, ९२, ९५, १६६, २२२.
धनवटे द. रा. - १३५, १४८, १५०, १८०, २९९, ३००, ३०७.
धर्माधिकारी दादा - २९.
पगडी सेतुमाधवराव - ६७, १०६, १२९,१४१,१५७, १६९.
पटवर्धन ना.म. - ४२, ४३, ४६, ५७, ५८, ६३, ८४, ३१३.
परुळेकर दादासाहेब - १७२.
पंडित ना.गो. - १४.
पंडिता रमाबाई - २४, २६.
पाटणकर ना. वि. - १३८, १६६, २०१.
पवार दया - २५०, २५१, २५४, २५५, २५७, २५८, २५९, २६५, २६८, २६९, २७०, २७१, २७८, २७९, २८०, २८१, २८८, २९०, ३१७, ३१८.
पाटील पां.ची. - ४१, ७८, ७९, १३८, १५१.
पाठक यशवंत - १३, ६६, १६५, १६६.
पिंगे द. रा. - १३८, १५१, १५४, १६८, १७९.
पेंडसे श्री. ना. - १३, १४, ११०, १११, १४५, १५२, १७६, २०९.
पैंगीणकर रा. रं. - ४२, ४३, २१३, २१४.
पोळके पार्थ - २४९, २५१, २५४, २५८, २६१, २६२, २६३, २६६, २६८, २८१, २८२.
फडके कमला - ३०२.
फडके ना. सी. - १३४, १४३, १४४, १६०, १७४, १७८, १९२, २१०, २२५, २२६, २२७, २२८, ३१५.
फडके सुधीर - १५१, १६७, १६८, १७१.
फुले जोतीराव - २३, २४, २५, ३११.
फुले सावित्रीबाई - २३.
बागल माधवराव - ५०, १६१, १८२, १८३.
बाबर कृ. भा. - १३८, २२४.
बेडेकर वा.वि. - ६१, ८०, ८१, ८२, १२३, १७९, १८५, २१२, ३१२.
बेडेकर विश्राम - १२, १३, ५४, १२४, १३३, १४६, १४८, १५०, १५५, १६०, १६३, १६६, १८५, २०४, २०५, २०६, २१५, ३१०, ३१४.

बेहरे ग. वा. - ७२, ७३, ९९, १००, १२७, १४४, १५३, १५४, १७०, १७३,१७८, १७९, २२१, २२२, ३०४.
भट दत्ता - ५२, ५३, १०१, १४४.
भागवत मंगला - १५८, ३१०.
भागवत मा.ल. - ४४, ६७, १५८, ३१०.
भावे पु. भा. - ५२, ५९, ६०, ६८, ८२, १५३, १५४, १५९, २०३, ३१२, ३१३, ३१६.
भोळे केशवराव - ४६, ५३, १०२, १०३, १२३, १३१, १४०, १४५, १५६, १९३.
महाडिक नारायण - १४.
माटे श्री. म. - ४६, ६३, ७२, १२४, १५०, १६२, १६५, ३०३, ३०७, ३१६.
माने लक्ष्मण - २४३, २४९, २५१, २५५, २५६, २५७, २६१, २६२, २६३, २६६, २७०, २८१, २८३, २८४.
मायदेव वा. गो. - ६०, ८०, ८१, ८२, १०६, १०७, १२६, १३७, १५०, १६९, १८४, १८९, १९०, २१६, २२४, २२७, ३१२.
मिरजकर एस. एस. - ४३, ४७, १४८, १६२, १७१, १७२, १९२.
मुळगुंद कृष्णदेव - १४.
मोटे ह. वि. - १२, १३, ५८, ६०, १२८, १४१, १४२, १४६, १४७, १४८, १६३, १६५, १६६, १८७.
मोरे दादासाहेब - २५३, २५७, २६३, २७१.
मोडक अ. वा. - ५१, ९३, ९५.
मोडक वि. आ. - ४२, ४५, ४८, ७२, ७३, ९४, १०३, १०४, १०५, १२४, १३६, १३७, १३८, १५३, १७७, १७८, १९०, २२३, २२४.
राजवाडे आहिताग्नि - ९३, १९३, ३०४, ३०५, ३०६, ३०७.
रानडे न्यायमूर्ती - २४.
रेगे शि. द. - ४१, ४३, ५०, ५१, ७७, ७९, १६३.
लिमये अरुण - १२.
लिंबाळे शरणकुमार - २४४, २५८, २५९, २६१, २६६, २६७, २७७, २७८, २७९, २८२, २८३, २८८, २८९.
वाटवे के. ना. - ६१, ६६, १५१, १५७, १९०, २२२, २२७.
वाटवे गजानन - ६२, ६६, ९२, २०१, २२४.
व्हटकर नामदेव - ४६, १०८, १०९, ११०, १२१, १२३, १३९, १७४, १७५, १७८, १९१, २२३.
शास्त्री य. बा. - १२८, १३१, १३२, १५३, १५४, १६०, १७५, १७८, २०२, २१३, ३०६, ३०७.
शिंदे ताराबाई - २३, २४, २५, २६, २९.
सरदेसाई गो. स. - १२२, १८९, १९०.
साधले आनंद - ४४, ४७, ६७, ६८, ७०, ७१, ७३, ७५, ९८, ९९, १२३, १५३, १५७, १६१, १८६, १९१, १९२, २१४, २२९, २३०, ३१०.
सारंग कमलाकर - १२.
सावरकर वि. दा. - ५८, ६०.
सूर्यवंशी स. ना. - ७०, ७३, ९५, ९६, १०५, १२३, १५२.
सोनकांबळे प्र. ई. - २७१, २७२.
क्षीरसागर श्री. के. - १३, १४, ६७, ९१, ९४, १२९, १३०, १३४, १४४, १५८, १५९, १६४, १६५, १६६, १८८, १९७, १९८, १९९, ३१४.

❑ ❑ ❑